


Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

ROTARY CLUB OF AMBAJOGAI CITY
25
SILVER JUBILEE
2001-2025

*ROTARY RUN*
*CANCER AWARENESS*

# रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी

# सहयोग

नोव्हेंबर-2025

## कार्य अहवाल

०१ सप्टेंबर २०२५ - ३० सप्टेंबर २०२५

**रो.रोहिणी पाठक**
अध्यक्ष २०२५-२६

**रो.मंजुषा जोशी**
सचिव २०२५-२६

सहयोग संपादक / डायरेक्टर पब्लिक इमेज

रो.अविनाश मुडेगांवकर

Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | तारीख | उपक्रमाचे नांव | पा.क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | ०४/११/२०२५ | प्रेरणा आणि संधी: क्रिकेट किट साहित्य वाटप ...................................... | |
| ०२. | ०६/११/२०२५ | आश्रमशाळेतील मुलींना प्रोत्साहन : क्रिकेट साहित्य वाटप.......................... | |
| ०३. | ०७/११/२०२५ | शेती विकास आणि संवाद : रोटरीची प्रभावी उपस्थिती ................. | |
| ०४. | ०९/११/२०२५ | अंधमुक्त गाव : मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शिबीर क्र.५........................ | |
| ०५. | २७/११/२०२५ | अंधमुक्त गाव : मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शिबीर क्र.६........................ | |
| ०६. | ०९/११/२०२५ | रोटरी रन : कॅन्सर अवेअरनेस रॅली ............................................ | |
| ०७. | १४/११/२०२५ | 'आरोग्य जागृकता मधुमेहावर नियंत्रण : भव्य मोफत शिबीर'........................ | |
| ०८. | १४/११/२०२५ | शांततेची बीजे बाल मनात : बालक दिन साजरा...... | |
| ०९. | १६/११/२०२५ | हाडांचे आरोग्य - निरोगी जिवनाचा पाया : मोफत बीएमडी व अर्थोपेडिक आरोग्य तपासणी शिबीर ..... | |
| १०. | २१/११/२०२५ | रांगोळीच्या रंगातून मतदान जनजागृती आणि स्पर्धा................... | |
| ११. | /१०/२०२५ | विकली मिटींग........................................................................ | |
| १२. | /१०/२०२५ | फ्लायर्स आणि बातम्या.................................................................. | |
| १३. | /१०/२०२५ | बर्थडे.................................................................................... | |




Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# हॅप्पी स्कुल अंतर्गत क्रिकेट किट व साहित्य वाटप...







दिनांक 4 नोव्हेंबर रोजी योगेश्वरी कन्या शाळेत या प्रसंगी रोटरी क्लब अंबाजोगाई सिटी च्या अध्यक्षा रोहिणी पाठक, यांनी क्रिकेट खेळाच्या साहित्याचे किट देण्याचे उद्दिष्ट स्पष्ट करीत "स्वप्न पाहणे आणि ती वास्तवात उतरवणे यात खूप सरावाची गरज असते असे सांगून रोटरीचे ह्या Happy School ची संकल्पना मांडली". उपाध्यक्ष धनराजजी सोळंकी, सचिव मंजुषा जोशी , प्रकल्प प्रमुख शकील भाई शेख, डॉ कल्पना मुळावकर मॅडम, क्लब ट्रेनर संतोष मोहिते सर, मुख्याध्यापिका श्रीमती परोपकारी मॅडम , उपमुख्याध्यापिका स्मिता धावडकर मॅडम, क्रीडा शिक्षिका अंजली रेवडकर (निर्माळे)मॅडम, इतर शिक्षक वृंद, तसेच रोटरी पदाधिकारी कल्याण जी काळे, अजित दादा देशमुख, अविनाशजी मुडेगावकर, रुपेश रामावत, रोटरॅक्ट क्लबचे सचिव मयुर परदेशी, शालेय मुलींची क्रिकेट टीम,विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंजली रेवडकर मॅडमने केले तर सूत्रसंचालन कराड मॅडम यांनी केले.

# आश्रमशाळेतील मुलींसाठी क्रिकेट साहित्य वाटप...




कै.वसंतराव नाईक माध्यमिक आश्रम शाळा इथे दिनांक 6 नोव्हेंबर 2025.रोजीरोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी तर्फे, आपल्या शालेय मुलींमध्येही त्या धैर्याचा, आत्मविश्वासाचा आणि जिद्दीचा संचार व्हावा या हेतूने आज के. वसंतराव नाईक आश्रम शाळा येथील मुलींना क्रिकेटचे साहित्य , ते शर्टस् कॅप्स यांचे वाटप करण्यात आले, या शाळेतील मुली मुख्यत्वे करून ऊसतोड कामगारांच्या मुली आहेत परंतु शाळेतून विभागीय पातळीवर खेळामध्ये चमकल्या आहेत.हा उपक्रम रोटरीच्या “हॅपी स्कूल” आणि “स्पोर्ट्स प्रमोशन” या दोन्ही सेवायोजनांखाली येतो.या प्रसंगी रोटरी क्लब अंबाजोगाई सिटी च्या अध्यक्षा रोहिणी पाठक, यांनी क्रिकेट खेळाच्या साहित्याचे किट देण्याचे उद्दिष्ट स्पष्ट करीत "स्वप्न पाहणे आणि ती वास्तवात उतरवणे यात खूप सरावाची गरज असते आणि प्रेरणा आणि संधी यांचा संगम सरावात असतो, असे सांगून रोटरीचे ह्या Happy School ची संकल्पना मांडली". याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक ठोंबरे सर, शिक्षक सहशिक्षिका,, क्रीडा शिक्षिक तसेच रोटरी पदाधिकारी, धनराज सोळंकी, कल्याण जी काळे, अजित दादा देशमुख, रुपेश रामावत, शालेय मुलींची क्रिकेट टीम,विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक रो.रुपेश रामावत यांनी केले . " क्रिकेट किट मिळतच मुलींनी जल्लोष करीत हॉल मध्ये भारतीय महिला टीम चे अभिनंदनपर घोषणा देत आनंद व्यक्त केला."

**Rotary**
Club of Ambajogai City

**UNITE FOR GOOD**

# कॅन्सरच्या जनजागृतीसाठी शहरातून निघाली रॅली.



9 नोव्हेंबर 2025 रोजी कॅन्सर या आजाराबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे . "नियमित तपासणी ,सुरक्षित भविष्य" "वेळीच ओळख , कॅन्सरचा विळखा". हा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे.

कॅन्सर हा आजार वाढत्या प्रमाणात समाजावर संकट बनत आहे. योग्य वेळी तपासणी, आरोग्यदायी जीवनशैली आणि जनजागृतीद्वारे कॅन्सर टाळता येऊ शकतो. या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी तर्फे एक जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली, ज्यात भारतीय जैन संघटन ,नर्सिंग कॉलेज चे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी, शहर पोलिस स्टेशनचे पोलीस कर्मचारी, रोटरी पदाधिकारी , रोक्ट्रॅक्टर्स, सोहम योगा क्लासेसचे सदस्य, मैत्री फाउंडेशन , बर्दापूरचे सदस्य , कॅन्सरच्या आजारातून ठीक झालेले रुग्ण आणि रोटरी मित्र नागरिकांचा सक्रिय सहभाग होता. बर्दापूर येथील, कॅन्सरसाठी अविरत काम करणारी संस्था मैत्री फाउंडेशनचे सदस्य सहभागी होते. यावेळी लातूर येथील सुप्रसिद्ध कॅन्सर तज्ज्ञ डॉ, अजय पुनपाळे यांनी उपस्थितांना, कॅन्सर आजरा विषयीसविस्तर माहिणी मार्गदर्शन केले.



## "शेती, विकास आणि संवाद – रोटरीची प्रभावी उपस्थिती!"




ग्लोबल विकास ट्रस्ट तर्फे आयोजित पत्रकार संवाद कार्यक्रमात रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या सदस्यांना विशेष चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमात केंद्रीय कृषिमंत्री शिवराज चव्हाण तसेच संस्थापक मयंक गांधी यांच्या समवेत संवाद साधण्याची संधी मिळाली.या प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. रोहिणी पाठक, प्रा. संतोष मोहिते, कल्याण काळे, अविनाश मुडेगावकर, अजय पाठक व राजेंद्र घोडके उपस्थित होते.या संवादातून कृषी विकास, शेतकऱ्यांच्या समस्या व संधी यांवर सकारात्मक चर्चा झाली व रोटरीच्या सहभागातून समाजाभिमुख कार्याची दिशा अधिक दृढ झाली.

## रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आनंदऋषिजी नेत्रालय अहिल्यानगर यांचे वतीने मोफत नेत्र तपासणी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व आनंदऋषिजी नेत्रालय, अहिल्यानगर यांच्या वतीने दिनांक 9 नोव्हेंबर आणि 27 नाव्हेंबर 2025 रोजी मोफत नेत्र तपासणी शिबीर क्रमांक 5 व 6 अंबाजोगाई व दैठणा राडी येथे पार पडले. या शिबिरात एकूण 75 रग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी 2 5 रूग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली. व 29 लोकांना चष्म्याचे वाटप करण्यात आले.





Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# आरोग्य जागरूकता मधुमेहावर नियंत्रण

जागतिक मधुमेह दिन (14 नोव्हेंबर 2025) निमित्त रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, योगेश्वरी डायबेटीस केअर सेंटर, IMA व AMPA यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मेगा डायबेटीस तपासणी व जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले.या उपक्रमाचे नेतृत्व डॉ. अतुल शिंदे (डायबेटोलॉजिस्ट) यांनी केले. तसेच डॉ. नवनाथ घुगे (कार्डिओलॉजिस्ट), डॉ. सुलभा पाटील, डॉ. राजेश इंगोले, डॉ. श्रीनिवास रेड्डी यांनी आरोग्य मार्गदर्शन करून मधुमेह नियंत्रण, जीवनशैली सुधारणा व प्रतिबंधात्मक उपायांबाबत जनजागृती केली.या शिबिरात 1990 नोंदणी, त्यापैकी 1702 तपासण्या, 123 नवीन मधुमेह रुग्ण, 207 उच्च-जोखीम रुग्ण ओळखले गेले तसेच 235 जणांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले. हा उपक्रम समाजात आरोग्य जागरूकता वाढवणारा ठरून रोटरीच्या "Service Above Self" तत्त्वाला साजेसा ठरला.











# "शांततेची बीजे बालमनात..."

दिनांक 14 नोव्हेंबर 2025 रोजी, Synergy National School, घाटणांदूर येथे रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या सहकार्याने बालदिन साजरा व Peace Week पारितोषिक वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी Peace Poster, Skit, Kindness Activity, Meditation यांसारख्या उपक्रमांत सहभाग घेतला असून सर्वांना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली.प्रमुख उपस्थितीमध्ये अध्यक्षा रो. रोहिणी पाठक, Peace Director रो. राजेंद्र घोडके व प्राचार्य अझहर पठाण यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना शांतता, मैत्री, सहकार्य आणि मूल्य शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.विद्यार्थ्यांनी गाणी, कविता व विविध सादरीकरणांद्वारे कार्यक्रम रंगतदार केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शांततेची जाणीव व सकारात्मक विचार वाढीस लागले.हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी व प्रेरणादायी ठरला.





Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# “हाडांचे आरोग्य – निरोगी जीवनाचा पाया”






दिनांक 16 नोव्हेंबर 2025 रोजी, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व Dr. Lamb Ortho Care यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत बोन डेन्सिटी (BMD) व ऑर्थोपेडिक आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराचा उद्देश हाडांची ठिसूळता, ऑस्टिओपोरोसिस, कॅल्शियम कमतरता याबाबत जनजागृती करणे व मोफत तपासणी सुविधा उपलब्ध करून देणे हा होता. या शिबीरामध्ये डॉ.श्रीनिवास लांब अर्थोपेडिक सर्जन, डॉ. ओम दहिफळे ,रोटरी अध्यक्षा रोहिणी पाठक यांच्यासह शिबीराचे उद्‌घाटक डॉ. नवनाथ घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबीरात 140 रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी 10 रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज, 20 जणांना फिजिओथेरपी सल्ला, तर 120 जणांमध्ये कॅल्शियमची कमतरता आढळली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनामुळे नागरिकांमध्ये हाडांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढली व योग्य उपचारासाठी दिशा मिळाली.

# “रंगांतून जागृती... मतदानासाठी एकजूट!

दिनांक 21 नोव्हेंबर 2025 रोजी, नगर परिषद अंबाजोगाई व रोटरी/रोट्रॅक्ट क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जागृतीसाठी भव्य खुली रांगोळी स्पर्धा श्री योगेश्वरी उद्यान येथे उत्साहात पार पडली.या उपक्रमात नागरिक, महिला, युवक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत मतदानाचे महत्व, लोकशाही व जबाबदारी या विषयांवर प्रभावी रांगोळ्या साकारल्या.या प्रसंगी प्रमुख उपस्थितीमध्ये उपजिल्हाधिकारी श्री दीपक वजाळे, तहसीलदार श्री विलास तरंगे, मुख्याधिकारी श्रीमती







प्रियंका टोंगे, श्री राकेश गीते, PI शरद जोगदंड तसेच रोटरी अध्यक्षा रो. रोहिणी पाठक, रोट्रॅक्ट अध्यक्षा विशाखा बजाज आणि इतर मान्यवर उपस्थित होते.विजेत्यांना रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले तसेच सर्व सहभागींसाठी सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.या स्पर्धेमुळे शहरात मतदार जागृतीचा प्रभावी संदेश पोहोचला व नागरिकांच्या सक्रिय सहभागाला चालना मिळाली.हा उपक्रम नागरी भान व सामाजिक जबाबदारी वाढविणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला.




# Weekly Meeting










# BIRTHDAY WISHES









**Rotary** Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# News Paper

मराठवाडा साथी

epaper.marathwadasathi.com
12 Nov 2025 - Page 5

## कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरीने काढला लॉगमार्च

» सामाजिक संस्थांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

---

दैनिक न्याय टाईम्स

## जागतिक मधुमेह दिनानिमित्त मधुमेहावरील महाशिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

---

लोकमत

## कॅन्सर जनजागृतीसाठी अंबाजोगाईमध्ये रोटरी क्लबने काढला लाँ

लोकमत न्यूज नेटवर्क

### कॅन्सर उपचारानंतर बरा होतो

कॅन्सर हा आजार उपचारानंतर पूर्णपणे बरा होतो. यासाठी शरीरात होणाऱ्या बदलांवर लक्ष ठेवा. या आजाराची लागण होत असल्याची प्राथमिक लक्षणे आढळून येताच उपचार घ्या. यामध्ये कॅन्सर पूर्णपणे बरा होतो, असे प्रतिपादन कॅन्सर तज्ज्ञ

### कॅन्सर पूर्वतप मोबाइल व्हॅन

यावेळी अनेकांनी जनजागृतीसाठी रो मदत केली. रो कॅन्सर रु करण्या मोबाइ आहे

कॅन्सरची भीती घालवण्यासाठी तसेच

Nov 12, 2025
erelego.com

---

दैनिक न्याय टाईम्स
संपादक : बालकिशन सोनी

## जागतिक मधुमेह दिनानिमित्त मधुमेहावरील महाशिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**सलग तेरा वर्षापासून मधुमेह तज्ञ डॉ. अतुल शिंदे यांचा उपक्रम**

अंबाजोगाई (प्रतिनिधी) :- समाजात वाढणारा मधुमेह रोखण्यासाठी विविध उपक्रम राबवत मधुमेहाची मोफत तपासणी व उपचार करण्यासाठी सदैव अग्रेसर असणारे मधुमेह तज्ञ डॉ. अतुल शिंदे यांनी सतराशे रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार केले या उपक्रमाचे त्यांचे तेरावे वर्ष आहे शुक्रवारी अंबाजोगाई येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, आय एम ए, एम्पा व योगेश्वरी डायबिटीस केअर सेंटर, प्रशांत नगर,अंबाजोगाई यांच्या वतीने मधुमेहावरील महा शिबिर व मोफत तपासण्या व मोफत औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक डॉ. अतुल शिंदे यांनी मधुमेह होऊ नये यासाठी पंचसूत्री सांगितली त्यासोबतच मधुमेहाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी आहाराचे व व्यायामाचे महत्त्व नमूद केले तसेच भारतातील वाढलेला मधुमेह रोखण्यासाठी जनजागृती चे महत्व सांगितले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नवनाथ घुगे, डॉ. श्रीनिवास रेड्डी,डॉ. राजेश इंगोले, डॉ. राहुल धाकडे, डॉ. उद्धव शिंदे, डॉ.सुलभा पाटील, डॉ. स्वाती शिंदे, प्रा.रोहिणी पाठक, मंजुषा जोशी उपस्थित होत्या.

सुरुवातीला मान्यवरांनी दीपप्रज्वल करून धन्वंतरीचे पूजन करण्यात आले .

यंदाचा डायबेटिक पेशंट ऑफ दि इयर पुरस्कार सुरेश मस्के यांना देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी डॉ नवनाथ घुगे, डॉ . राजेश इंगोले , डॉ .श्रीनिवास रेड्डी, डॉ सुलभा पाटील यांची भाषणे झाली.वैद्यकीय प्रतिनिधी निलेश सूर्यवंशी, अविनाश धायगुडे, उमेश देशमुख , रणजीत मंगे,विनोद स्वामी , अजित स्वामी ,माधवी सरवदे ,सारिका जाधव यांचाही सत्कार करण्यात आला. सुरुवातीला प्रा . रोहिणी पाठक यांनी प्रास्ताविक केले . पाहुण्यांचे स्वागत डॉ . स्वाती शिंदे यांनी केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवकुमार निर्मळे यांनी केले . शेवटी मंजुषा जोशी यांनी सर्वांचे आभार मानले .

15 Nov 2025 - Page 4 | epaper.nyaytimes.in
Powered by softisky | 9764331134

---

## कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरीच्या वतीने लॉंगमार्च

---

## जागतिक मधुमेह दिनानिमित्त मधुमेहावरील महाशिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

---

पुण्य नगरी

## कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरीच्या वतीने लॉंग मार्च

सामाजिक संस्थांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

### कॅन्सर उपचारानंतर बरा होतो- डॉ.अजय पुनपाळे

---

दैनिक न्याय टाईम्स
संपादक : बालकिशन सोनी

## कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरीने काढला लॉगमार्च

**सामाजिक संस्थांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग**

अंबाजोगाई (प्रतिनिधी) :- समाजात कॅन्सर या रोगाबिषयी जागरूकता निर्माण होण्यासाठी उपचारानंतर हा आजार पुर्णतः बरा होतो. हा संदेश देत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने कॅन्सर जनजागृतीसाठी शहरात लॉगमार्च काढून आरोग्य ...

... या लॉगमार्चचा प्रारंभ झाला. कॅन्सर जनजागृतीचे विविध फलक हातात घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शहरातून ही रॅली काढली. रॅलीचा समारोप पोलिस स्टेशन येथे झाला. यावेळी अनेकांनी कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरी क्लबला आर्थिक मदत केली. रोटरी क्लबच्या वतीने कॅन्सर रुग्णांची पुर्व तपासणी करण्यासाठी रोटरी क्लब मोबाईल व्हॅन उभी करणार आहे. यासाठी हा मदत निधी जमा करण्यात येत असल्याचे रोटरी क्लबच्या अध्यक्षा रोहिणी ...

... सोहम योगा क्लास काळवटी मुडमॉर्निंग ग्रुप यांच्यासह शहरातील सामाजिक संस्था या उपक्रमात सहभागी झाल्या.

कॅन्सर उपचारानंतर बरा होतो- डॉ.अजय पुनपाळे

कॅन्सर हा आजार उपचारानंतर पुर्ण पणे बरा होतो. यासाठी शरीरात होणार्या बदलांवर लक्ष ठेवा. या आजाराची लागन होत असल्याबद्दल प्राथमिक लक्षणे आढळुन येताच उपचार घ्या. यातून कॅन्सर पुर्णपणे बरा होतो.

---

चंपावतीपत्र

epaper.champavateepatra.in
Page 5 - 15 Nov 2025

## जागतिक मधुमेह दिनानिमित्त मधुमेहावरील महाशिबिरा

अंबाजोगाई । वार्ताहार

सलग तेरा वर्षापासून मधुमेह तज्ञ डॉ. अतुल शिंदे यांचा उपक्रम समाजात वाढणारा मधुमेह रोखण्यासाठी विविध उपक्रम राबवत मधुमेहाची मोफत तपासणी व उपचार करण्यासाठी सदैव अग्रेसर असणारे मधुमेह तज्ञ डॉ. अतुल शिंदे यांनी सतराशे रुग्णांची मोफत तपासणी व औषधोपचार केले या उपक्रमाचे त्यांचे तेरावे वर्ष आहे शुक्रवारी अंबाजोगाई येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, आय एम ए, एम्पा व योगेश्वरी डायबिटीस केअर सेंटर, प्रशांत नगर, अंबाजोगाई यांच्या वतीने मधुमेहावरील महा शिबिर व मोफत तपासण्या व मोफत औषध उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक डॉ. अतुल शिंदे यांनी मधुमेह होऊ नये यासाठी पंचसूत्री सांगितली त्यासोबतच मधुमेहाचे दुष्परिणाम टाळण्यासाठी आहाराचे व व्यायामाचे महत्त्व नमूद केले तसेच भारतातील वाढलेला मधुमेह रोखण्यासाठी जनजागृती चे महत्व सांगितले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नवनाथ घुगे, डॉ. श्रीनिवास रेड्डी, डॉ. राजेश इंगोले, डॉ. राहुल धाकडे, डॉ. उद्धव शिंदे, डॉ.सुलभा पाटील, डॉ. स्वाती शिंदे, प्रा.रोहिणी पाठक, मंजुषा जोशी उपस्थित होत्या. सुरुवातीला मान्यवरांनी दीपप्रज्वल करून धन्वंतरीचे पूजन करण्यात आले. यंदाचा

---

पुण्य नगरी

## कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरीच्या वतीने लॉंग मार्च

सामाजिक संस्थांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

### कॅन्सर उपचारानंतर बरा होतो- डॉ.अजय पुनपाळे

Rotary Club of Ambajogai City | UNITE FOR GOOD

# फ्लायर्स





































